महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय
मोर्शी रोड अमरावती ४४४ ६०३
www.amravati.dvet.gov.in e-mail:jtdir.amaravati@dvet.gov.in
Section email est.roamt@dvet.gov.in Phone No.(0721)2666048 (Personal) 2666186

क्र:प्राकाअम/आस्था-४ /नियुक्ती/२०२५/ 2532 दिनांकः- 22/०४/२०२५

**परीपत्रक**

**विषय :** " **शिल्पनिदेशक" व गणित तथा चित्रकला निदेशक** या पदधारकाची **दिनांक ०१.०१.२०२५ ची** स्थिती दर्शविणारी **सुधारीत, एकत्रीत-तात्पुरती** जेष्ठता सूची प्रसिध्द करण्याबाबत.

**संदर्भ : १)** अधिसुचना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, राजपत्र असाधारण भाग चार-अ असाधारण क्र.९८ दि.२० जून २०२१
२) अधिसुचना महाराष्ट्र शासन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, राजपत्र असाधारण भाग चार-अ असाधारण क्र.११५ दि.१० जुलै २०२४
३) या कार्यालयाचे परीपत्रक क्र.प्राकाअम/आस्था-४/नियुक्ती/२०२५/६७२ दि. २८/०१/२०२५

--------००--------

या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कार्यरत " **शिल्पनिदेशक" व गणित तथा चित्रकला निदेशक** सुधारीत संरचनेतील वेतनश्रेणी रु. ३८६००-१२२८००/- वेतनस्तर एस-१४ या संवर्गातील पदधारकांची **दिनांक ०१/०१/२०२५** ची स्थिती दर्शविणारी संदर्भ क्र.३ अन्वये यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली **एकत्रीत-तात्पुरती** जेष्ठता सूची या परीपत्रकान्वये रदद करण्यात येत असुन त्याऐवजी " **शिल्पनिदेशक" व गणित तथा चित्रकला निदेशक** या पदनामाची **सुधारीत एकत्रीत तात्पुरती** जेष्ठता सुची या कार्यालयाच्या **https://amravati.dvet.gov.in** या संकेत स्थळांवर प्रसिध्द करण्यांत येत आहे.

सदरील जेष्ठता सुचीमधील नावे आपल्या संस्थेतील कार्यरत कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन देऊन त्याची एक प्रत नोटीस बोर्डावर डकवण्यात येऊन जे कर्मचारी दिर्घ मुदतीच्या सुटीवर असतील त्यांना जेष्ठता सुचीची प्रत त्यांचे पत्त्यावर पोहोच करावी. जेष्ठता सुचीतील संपुर्ण बाबी तपासुन कर्मचा-यांचे आक्षेप/हरकती असल्यास या कार्यालयास दिनांक ०७/०५/२०२५ पर्यंत हस्देय सादर करण्यात यावीत. जेणेकरुन सदरील तात्पुरती सेवाजेष्ठता सुची अंतीम करणे सोईचे होईल.

वरील दिनांकानंतर प्राप्त होणारे आक्षेप/तक्रारी/हरकती/निवेदने यांचा कोणत्याही सबबीवर विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. व संबंधित कर्मचारी यांना आपल्या स्तरावरुन तसे सुचविण्यात यावे. व त्याची पोच घेऊन या कार्यालयास अहवाल सादर करावा. आक्षेप नोंदवतांना योग्य त्या सबळ पुराव्यासह सादर करावा.

**सहपत्र -** तात्पुरती जेष्ठता सुची अ.क्र.१ ते ५७४

(प्रदिप घुले)
प्र.सहसंचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय,अमरावती.

**प्रत :- माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता.**

१) मा. संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई-१ **कार्यासन क्रमांक ०४** यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपुर/औरंगाबाद/पुणे/मुंबई/नाशिक.
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, अमरावती/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वाशिम.
४) प्रादेशिक कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्था प्रमुख.
५) अ-४/अ-५/अ-६ विभाग, प्रादेशिक कार्यालय, अमरावती.
६) सौ. बि. एम. वानखडे, शिल्पनिदेशक(कोपा)( सेवावर्ग), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय,अमरावती यांना अंतिम जेष्ठता सूची या कार्यालयाच्या **https://amaravati.dvet.gov.in** या संकेत स्थळांवर प्रसिध्द करण्याकरीता अग्रेषित.